तरुण भारत संवाद शुक्रवार, १५ ऑगस्ट २०२५



कोल्हापूर : विद्यार्थी जनजागृती कार्यक्रमात जिल्हाधिकारी अमोड येडगे यांचे स्वागत करताना

# स्क्रीन टाईम हा स्टडी टाईम बनवा, ध्येय निश्चित करा

- जिल्हाधिकारी अमोल येडगे
- आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त विद्यार्थी जनजागृती अभियान कार्यक्रम

प्रतिनिधी
कोल्हापूर

युवक ही आपल्या देशाची शक्ती असून मजेत जीवन जगताना ध्येय निश्चित करा. व्यसनांपासून दूर रहा. स्क्रीन टाईम हा बुक टाईम, ग्राउंड टाईम आणि स्टडी टाईम बनवा. अधिकाधिक ज्ञान मिळवा. खडतर परिश्रम घेऊन उत्तम करिअर घडवा आणि यशस्वी होऊन आपल्या जिल्ह्याचे नाव जगभरात उज्वल करा, अशा शब्दांत यशस्वी जीवनाचा मूलमंत्र जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी युवकांना दिला.

जिल्हा प्रशासन, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत व श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे विवेकानंद कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त विद्यार्थी सहाय्यता जनजागृती अभियान कार्यक्रम जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृती भवन येथे पार पडला.

यावेळी समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त सचिन साळे, कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, व्याख्याते प्रा. मधुकर पाटील तसेच अन्य मान्यवर व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उत्पन्नाचा दाखला, राष्ट्रीयत्वाचा दाखला, जात व नॉन क्रिमीलेअर दाखल्यांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. सारथी उपकेंद्राच्या सह व्यवस्थापकीय संचालक किरण कुलकर्णी म्हणाल्या, शासनाच्या योजनांची माहिती युवकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी महाविद्यालयांमध्ये समन्वय समिती स्थापन करण्यात येत आहे.

पोलीस उप निरीक्षक सायली पडवळ , व्याख्याते मधुकर पाटील यांनी मार्गदर्शन केले. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे म्हणाले, आदर्श युवा घडवण्याचे मोलाचे कार्य स्वामी विवेकानंदांनी केले आहे. मोबाईलचा वापर करा, पण चॅट जीपीटी ॲप व एआयसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करुन ज्ञानात भर घाला. प्रा. प्रवीण बागडे यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ. संदीप पाटील यांनी आभार मानले.

शुक्रवार, १५ ऑगस्ट २०२५ MY कोल्हापूर पुढारी

# विवेकानंद कॉलेजमध्ये भित्तिपत्रिका प्रकाशन

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमधील मराठी विभागाच्या वतीने विवेक भित्तिपत्रिकेच्या 'श्रावणधारा' या विशेषांकाचे प्रकाशन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते झाले. प्राचार्य डॉ. कुंभार यांनी भित्तिपत्रिकेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या लेखन कलागुणांना व्यासपीठ मिळते, असे सांगितले. एकनाथ आळवेकर यांनी स्वागत केले. सूत्रसंचालन ऋतुजा बिरांजेने केले. प्रा. डॉ. प्रदीप पाटील यांनी आभार मानले.

पुण्य नगरी
शुक्रवार, १५ ऑगस्ट २०२५ | कोल्हापूर -

# डॉ. रंगनाथन यांच्यामुळे ग्रंथालये शास्त्रीय चाकोरीत : गावडे

कोल्हापूर : प्रतिनिधी

डॉ. रंगनाथन यांच्यामुळे ग्रंथालये साचेबद्ध शास्त्रीय चाकोरीत आली. विद्यार्थ्यांची पावले नेहमी ग्रंथालयाकडे वळावीत, हीच पावले जीवनाचा मार्ग दाखवतील, असे प्रतिपादन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी केले. विवेकानंद कॉलेजमध्ये डॉ. एस. आर. रंगनाथन जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते.

स्वागत व प्रास्ताविक सहाय्यक ग्रंथपाल हितेंद्र साळुंखे यांनी केले. आर. आर. साळुंखे, बी. ए. नारे, बी. एस. खोत, अजित जाधव, सुरेश इंगळे, प्रमोदिनी जाधव, प्रियांका दुर्गुळे, प्रतीक पानारी यांनी संयोजन केले. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे यांचे प्रोत्साहन लाभले.



कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंती कार्यक्रमात कौस्तुभ गावडे यांच्यासह मान्यवर.